I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 371-377
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# व्यक्तिमत्व विकास आणि ग्रंथालय

**रंजना भा. व्यवहारे**
विमेन्स कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स, न्यु नंदनवन, नागपूर

Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023 Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश :–**

समाजात राहणा–या प्रत्येक व्यक्तिचे व्यक्तिमत्व हे एक दुस–या पेक्षा प्रत्येक बाबतीत वेगळे असल्याचे दिसून येते. प्रत्येक व्यक्ति आपल्या परीने राहण्याचा प्रयत्न करतो. काही व्यक्ति जसे आहेत तसेच राहतात. पण काही व्यक्ति समाजात वावरतांना आपल्या व्यक्तिमत्वाची छाप,ठसा उमटविण्याचा प्रयत्न करतात. याकरीता त्याने आपले व्यक्तिमत्व विकसीत करण्याचा प्रयत्न केलेला असतो. व्यक्तिचे व्यक्तिमतव विकसीत होण्यामध्ये अनेक घटकांचा समावेष असतो. जसे त्याचे घरातील वातावरण, आजूबाजूचा परिसर, त्याचे मित्रमंडळ, षिक्षक, या सर्व गोष्टीचा व्यक्तिच्या व्यक्तिमत्वावर प्रभाव राहतो. तसाच प्रभाव आणखी एका गोष्टीचा त्याच्यावर प्रभाव राहतो तो म्हणजे ग्रंथालय. व्यक्ति शालेय जीवना पासूनच ग्रथालयाच्या संपर्कात येतो. ग्रंथालयात जे वेगवेगळया प्रकारचे वाचन साहित्य असते जसे की, कथा, कादंबरी, थोरा मोठयाचे चरित्र, आत्मचरित्र, व्यक्तिमत्व विकासावरील पुस्तके, स्पर्धा परीक्षे वरील पुस्तके, जनरल नॉलेज, अनेक प्रकारची मासिके, अनेक वृत्तपत्रे अषाप्रकारच्या साहित्याचे वाचन केल्यानंतर व्यक्तिच्या ज्ञानात वाढ होत जाते तसेच व्यक्तिमत्वाचा विकास होतांना दिसून येतो. व्यक्तिच्या ज्ञानाची लालसा भागविण्याचे काम ग्रंथालय करीत असते. म्हणूच व्यक्तिच्या व्यक्तिमत्व विकासात ग्रंथालयाचे स्थान मोलाचे असल्याचे दिसून येते.

**प्रस्तावना:–**

समाजात प्रत्येक व्यक्ति जन्माला आल्यापासून त्याचे स्वतःचे व्यक्तित्व वेगळे असते. एका ठराविक वयानंतर प्रत्येकाला स्वतःचे व्यक्तिमत्व विकसित करण्याकडे लक्ष द्यावे लागते. किंवा व्यक्तिमत्व विकास घडविण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. जोपर्यंत वय लहान असते तोपर्यंत त्याचे विष्व त्याचे आई वडिल, कुटुंब एवढच असते. तर थोडे मोठे झाल्या नंतर म्हणजेच षाळेत जायला लागल्यावर कुटुंबासोबत त्याची षाळा, षिक्षक, मित्रमंडळ हे त्याचे विष्व बनत जाते. जसजस षिक्षण पुढेपुढे जाते तसतसे त्याचे विष्व वाढत जाते. अनेक समस्यांना तुम्हाला सामोरे जावे लागते. षिक्षण घेत असतांना अनेक अडचणी येतात. त्या स्वतःच्या स्वतःच सोडवाव्या लागतात. प्रत्येक वेळेस अडचणी सोडवितांना किंवा समस्येला समोर जातांना आईवडिल किंवा मित्र सोबत असतीलच असे नाही आणि इथूनच तुमच्या व्यक्तिमत्वाला खरे पैलू पडत असतात. हेच वय असे असते की व्यक्ति समाजात खऱ्याअर्थाने जीवन जगणं षिकत असतो. इथपासूनच व्यक्तिचा व्यक्तिमत विकास होण्यास खऱ्या अर्थाने सुरूवात होते. प्रत्येकालाच आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास स्वतःच घडवावा लागतो. जीवन जगत असतांना अनेक संघर्षाचा सामना करावा लागतो. ज्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व प्रभावी असते ती व्यक्ती या संघर्षांना सहजपणे सामोरे जातांना दिसतात. व्यक्तिमत्व विकास योग्य प्रकारे होण्याकरीता अनेक घटनांचा किंवा गोष्टी महत्वाच्या असतात. त्याचप्रमाणे ग्रंथालयाची देखील महत्वाची भूमिका असते असे म्हणता येईल. व्यक्तिचा विकास होण्याकरीता त्या व्यक्तिची वाचण्याची सवय सर्वात महत्वाची मानल्या जाते. ज्या व्यक्तिला वाचनाची सवय राहते. त्याचे वाचन हे चौफेर

राहते आणि त्या प्रत्येक वाचलेल्या पुस्तकातून त्याचे व्यक्तिमत्व घडण्यास मदत झालेली असते. पुस्तके हे कोणत्याही प्रकारचे असो त्या पुस्तकात काहीतरी महत्वाचा संदेष जरूर राहतो आणि त्यामुळेच त्याच्या व्यक्तिमत्वात त्या पुस्तकातील चांगल्या गोष्टीचा प्रभाव पडत राहतो.

**व्यक्तिमत्व म्हणजे काय?**

समाजात व्यक्ति तेवढया प्रवृत्ती अषी म्हटले जाते. काही व्यक्ती मध्ये एखाद्यावेळेस साधर्म्य दिसून येत असले तरी प्रत्येक व्यक्तिचे स्वतःचे व्यक्तित्व हे मूळातच वेगळे असल्याचे दिसून येते. व्यक्ति जन्माला येतो तेव्हा त्यांच्या कुटुंबातील व्यक्तिचा प्रभाव त्याच्यावर पडत असतो. त्या कुटुंबाचे समाजात असलेले स्थान घरातील व्यक्तिचे आपसातील असलेले संबंध त्यांची आर्थिक स्थिती या सर्व गोष्टींचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर परिणाम दिसून येतो. व्यक्तित्व म्हणजे व्यक्तिच्या शरीर, मन, बुध्दी यांचा आपल्या वागण्या बोलण्यातून होणारा एकत्रित परिणाम होय. हा परिणाम कुटुंबाकडुन, समाजाकडून समाजातील सांस्कृतिक वारसा आलेला आहे असे म्हणता येईल.

मनुष्य हा सामाजीक प्राणी आहे. फक्त कुटुंबात राहुनच व्यक्तिचे व्यक्तिमत्व घडेल असे होत नाही. व्यक्ति समाजात वावरत असतांना समाजातील अनेक घटनांचा त्याच्यावर प्रभाव पडतो आणि नकळतपणे या घटनांच्या प्रभावामुळेच त्याच्या व्यक्तिमत्वाचा विकास होत जातो. समाजात वावरतांना त्याला अनेक गोष्टी माहिती होतात. काही गोष्टी या त्याला समजतात, रूजतात व काहीत्याला रूजत नाही. समाजासाठी समाजातील लोकांसाठी काही कामे तो स्वतः करू पाहतो. काही नविन गोष्टीची सुरूवात त्याला करावषी वाटते व स्वतःच्या जबाबदारीने काहीतरी नविन करण्याचा प्रयत्न करू पाहतो. व त्याच्या पहिल्याच प्रयत्नात समाजात त्याच्या कामाची छाप पडून जाते व त्याचे व्यक्तिमत्व प्रसिध्दीस येते. पहिल्याच प्रयत्नात समाजात त्याच्या कर्तव्याचा ठसा उमटल्याने त्याला त्याच्या कामाप्रती प्रोत्साहन मिळते व अजून काही तरी नविन करण्याच्या प्रयत्नात तो सतत प्रयत्नषील राहतो. समाजातील लोकांनाही त्यांनी केलेले काम आवडायला लागते. व त्यामुळेच त्याच्या व्यक्तिमत्वाचा विकास होण्यास सुरूवात होते.

समाजाच्या विविधांगी गरजाची जाणीव समाजातील घटक या नात्याने सर्वांना असते. यात षिक्षण ही गरज अधिक महत्वाची मानली जाते. षिक्षणाद्वारे सुषिक्षित व कर्तव्याचे षिक्षण आणि व्यक्तिमत्व विकास असणारा व्यक्ति निर्माण होतो. व्यक्तिमत्व विकासात षिक्षणाला महत्वाचे स्थान आहे. आजच्या सध्याच्या काळात मूल तीन वर्षाचे झाले की त्याला शाळेत घातले जाते. शाळेत गेल्यानंतर षिक्षक जे सांगेल, षिकवेल त्याचे अनुकरण ते बरोबर करतात. घरी त्यांना कितीही चांगल्या पध्दतीने सागण्याचा प्रयत्न केला तरी त्यांच्या षिक्षकाने सांगीतलेले त्यांना बरोबर वाटत राहते. शाळेमध्येच मुलांना सगळया बरोबर षिकतांना गंमत वाटते. या षिक्षणातून त्याचे व्यक्तिमत्व हळूहळू विकसित व्हायला सुरूवात होते. मूल जसजसे मोठया वर्गात जातात तसतसे त्याच्या वेगवेगळया प्रकारचे बदल घडून यायला सुरूवात होते. शाळेत विद्यार्थ्यांना अनेक प्रकारचे प्रोजेक्ट तयार करणे, विविध प्रकारच्या स्पर्धा

परीक्षा देणे, वेगवेगळया विषयाची माहिती शोधणे ती गोळा करणे यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास शाळेपासूनच सुरूवात होते.

षिक्षण हे मनुष्याच्या जवळ असणारे खूप मोठे महत्वाचे हत्यार मानल्या जाते. षिक्षणाने मनुष्य षिक्षित, आत्मनिर्भर, विचारी होण्यास मदत होते. जसतसे विद्यार्थ्यांचे षिक्षण वाढत जाते. तसतसे त्याच्या मध्ये आत्मविष्वास निर्माण होण्यास मदत होते. समाजात वावरतांना अनेक समस्यांचा सामना व्यक्तिला करावा लागतो. जीवनात येणाऱ्या प्रत्येक अडचणींचा सामना योग्य तऱ्हेने करण्यासाठी त्याला स्वतःच्या आत्मविष्वासाची आवष्यकता भासते. हा स्वतःमधील आत्मविष्वासच व्यक्तिला जीवनात यषस्वी होण्यास मदत करीत असतो. षिक्षणाने व्यक्ति, षिक्षित, स्वावलंबी, संयमी, विचारकरण्याची क्षमता, आत्मनिर्भयी बनवते. ज्याप्रकारचे षिक्षण व्यक्ति घेतो त्यानुसार त्याच्या व्यक्तिमत्वावर त्याचा प्रभाव पडत राहतो. षिक्षणाचे क्षेत्र कोणतेही असो. प्रत्येक जण आपल्या आवडीनुसार षिक्षणक्षेत्र निवडतो व त्याने निवडलेल्या क्षेत्रात स्वतःचे व्यक्तिमत्व विकसीत करण्याचा प्रयत्न करतो.

**ग्रंथालय आणि व्यक्तिमत्व विकास :—**

व्यक्ति समाजात वावरत असतांना त्यांच्या अनेक गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत असतो. त्या अनेक गरजापैकी षिक्षण ही एक महत्वाची गरज मानल्या जाते. मूल लहान असल्यापासून त्याच्या षिक्षणाचा विचार केल्या जातो. षिक्षणाने माणूस सुषिक्षित व एक जबाबदार नागरीक तयार होत असतो. समाजात आदर्ष व उन्नत नागरीक तयार होण्यासाठी विविध संस्था स्थापन झालेल्या आहे. ग्रंथालय ही सुध्दा अषाच प्रकारची एक सामाजिक संस्था आहे. ग्रंथालया मध्ये विविध प्रकारच्या असणाऱ्या ज्ञानसाहित्याद्वारे वाचकाचे मनोरंजन तर होतेच. पण त्याचबरोबर त्यांची ज्ञानलालसा भागवून त्यांच्या ज्ञानातही वाढ होते व त्याच बरोबर त्याच्या मनावर योग्य रित्या संस्कार होण्यास मदतही होते.

प्रत्येक षिक्षण संस्था ही महत्वाची संस्था मानल्या जाते. शाळा, कॉलेज, महाविद्यालय या प्रत्येक संस्थेत ग्रंथालय हा संस्थेचा अविभाज्य भाग बनलेले आहे. प्रत्येक शाळा कॉलेजमध्ये ग्रंथालय हे असतेच. विद्यार्थी शाळेत असतांनाच त्यांना ग्रंथालयाची ओळख करून दिल्या जाते. शाळेपासून विद्यार्थ्यांना वेगवेगळया प्रकारची पुस्तके वाचण्याची सवय लागावी म्हणून एक तासिका ग्रंथालयासाठी देण्यात येते. ज्या दिवषी ग्रंथालय तासिका असेल तेव्हा विद्यार्थ्यांना ग्रंथालयात नेवून ग्रंथालयाची ओळख करून दिल्या नंतर सगळया ग्रंथसंग्रहाचा परिचय करून देण्यात येतो. यामुळे विद्यार्थ्यांना पुस्तका विषयी उत्साह वाढतो व ते पुस्तक वाचणाकडे ओढल्या जातात. शाळेत असतांना छोटी छोटी कथासंग्रह, कादंबऱ्या आत्मचरित्रे ही त्याच्या वाचनात आल्याने त्यांची वाचनात रूची निर्माण होण्यास मदत होते. एकदा विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लागली तर ती सवय निरंतर राहते. या सवयीमुळे हळूहळू वेगवेगळया प्रकारची पुस्तके वाचनाची सवय वाढत जाते. व प्रत्येक वाचलेल्या पुस्तकात काहीनकाही चांगल्या प्रकारचे बोध, ज्ञान त्यांना मिळत राहतो. या सगळया गोष्टींची छाप विद्यार्थ्यांच्या

व्यक्तिमत्वावर पडत राहते. त्याचे व्यक्तिमत्व हळूहळू विकसीत होत जाते.

ग्रंथालय ही संस्था जषी शैक्षणिक संस्थाचा एक अविभाज्य भाग आहे. त्याचप्रमाणे समाजासाठी सुध्दा एक महत्वाची संस्था असल्याचे दिसून येते. समाजात व्यक्तिंना वेगवेगळया कामासाठी काही महत्वाची माहिती पाहिजे असते. काही अभ्यासक, संषोधक तसेच काहींना आपली वाचनाची आवड जोपासण्यासाठी ग्रंथालय ही महत्वाची संस्था आहे. समाजात दररोज नविन माहितीचा उदय होत असतो. अभ्यासक विद्यार्थ्यांना त्यांचा अभ्यास करतांना वेगवेगळया विषयावर माहिती पाहिजे असते. ती माहिती पुस्तकातून सविस्तर रूपात त्यांना ग्रंथालयातून मिळण्यास मदत होते. तसेच संषोधक संषोधन करीत असतांना त्यांना त्यांच्या संषोधनाच्या विषयाषी संबंधीत माहिती पुस्तके तसेच नुकतेच त्यांच्या संषोधनावर प्रकाषीत झालेली माहिती ही सर्व त्यांना ग्रंथालयातून सहजरित्या मिळू शकते. संषोधकाना संषोधन करीत असतांना सर्वात जास्त माहिती मिळविण्यासाठी ग्रंथालयाचा उपयोग होतो. तसेच समाजात प्रत्येक ठिकाणी सार्वजनिक ग्रंथालय विकसीत झालेली आहे. या सार्वजनिक ग्रंथालयाचा समाजातील व्यक्तिचे व्यक्तिमत्व विकसीत होण्यास खूप मदत होते. सार्वजनिक ग्रंथालयात अनेक प्रकारचा ग्रंथसंग्रह उपलब्ध असतो. समाजातील जी लोक शाळा, महाविद्यालय ग्रंथालयाचा वापर करू शकत नाही. ती सार्वजनिक ग्रंथालयाचा वापर करून आपली वाचनाची आवड पूर्ण करून त्यांना पाहिजे असलेली माहिती मिळवू शकतात. काही वेळेस अभ्यास करणारे व संषोधकांना सुध्दा सार्वजनिक ग्रंथालयाचा त्यांच्या संषोधनात वापर करावा लागतो. समाजात संस्कृती संवर्धनाचे व माहिती देण्याचे कार्य ग्रंथालये करते. वाचकांना आनंद मिळवून देण्यासाठी, त्यांना उल्हासित ठेवण्यासाठी तसेच त्यांना पाहिजे असलेले वाचनीय साहित्य उपलब्ध करून देणे विद्यार्थ्यांना पाहिजे असलेले शैक्षणिक वाचनीय साहित्य उपलब्ध करून देणे इ कार्य ग्रंथालयाद्वारे केल्या जातात.

व्यक्तिमत्व विकास आणि ग्रंथालय याचा विचार करीत असतांना ग्रंथालयात असणाऱ्या अनेक वाचनीय साहित्याचा वापर करून व्यक्तिमत्व विकास साधता येतो.

1) जनरल नॉलेज पुस्तके 2) स्पर्धा परिक्षेची पुस्तके 3) कथा 4) कादंबरी 5) आत्मचरित्रे 6) कविता 7) संदर्भ ग्रंथे 8) मासिक 9) जर्नल्स् 10) वृत्तपत्रे

**1) जनरल नॉलजे जपुस्तके** :—ग्रंथालयात अनेक प्रकारची वाचनीय साहित्य असतात. तसेच जनरल नॉलेजची पुस्तके असतात. ज्यांना आपले ज्ञान वाढवायचे आहे किंवा प्रत्येक क्षेत्रात घडणाऱ्या ताज्या घडामोडीची माहिती करून घ्यायची असेल तर जनरल नॉलेजची पुस्तके महत्वाची असतात. ही पुस्तके वाचून विद्यार्थी किंवा कोणतीही व्यक्ती आपल्या ज्ञानात भर घालू षकतात. जनरल नॉलेज हा असा विषय आहे की त्यात सगळया क्षेत्राषी संबंधीत माहिती एकाच ठिकाणी मिळते. ही जनरल नॉलेजची पुस्तके वाचून प्रत्येक व्यक्ति आपले ज्ञान अद्यावत ठेवून आपल्या व्यक्तिमत्व विकासात भर पाडू षकतात.

**2) स्पर्धा परीक्षेची पुस्तके** :– स्पर्धा परीक्षा या वेगवेगळया असतात. ग्रंथालयात अनेक स्पर्धा परीक्षेची निरनिराळी पुस्तके असतात. विद्यार्थी षिकत असतांना स्पर्धा परीक्षेच्या पुस्तकाचे वाचन करणे जर सुरू केले तर त्यांना वेगवेगळया परीक्षेची माहिती मिळते आणि त्यांना स्वतःला कषात करिअर करायचे आहे. याचाही ते विचार करू षकतात. या पुस्तक वाचनाने त्यांच्या जीवनाला वेगळया प्रकारची कलाटणी मिळण्यास मदत होते. ही पुस्तके वाचल्या मुळे विद्यार्थ्यांना प्रत्येक परीक्षे संबंधी माहिती तर मिळतेच त्याच बरोबर त्यांच्या ज्ञानात भरघोस वाढ होण्यास मदत मिळते. स्पर्धा परीक्षे संबंधी माहिती मिळाल्याने त्यांच्या जीवनाला एक वेगळा आकार मिळण्यास मदत मिळते व त्यांच्या ज्ञानात चौफेर अषी वाढ होण्यास मदत होते.

**3) कथासंग्रह** :–विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लागावी म्हणून सुरूवातीस त्यांना ग्रंथालयातून छोटीछोटी कथासंग्रहाची पुस्तके वाचण्यास प्रोत्साहन दिले जाते. कथासंग्रह मध्ये लहानलहान गोष्टी असतात. एक दोन पानाच्या गोष्टी असल्याने विद्यार्थ्यांनाही वाचनात मजा येते व त्यामुळे त्याच्या वाचनात आवड निर्माण होण्यास मदत होते. हळूहळू त्यांना वाचनाची सवय लागते. व या नंतर ते अनेक प्रकारची पुस्तके वाचण्यास स्वतःच तयार होतात. या वाचलेल्या पुस्तकातुन त्यांना नक्कीच आनंद मिळतो व त्यांच्या विकासात भर पडत जाते.

**4) कादंबरी** :–कादंबरी या अनेक प्रकारच्या असतात. सामाजिक, राजकीय, प्रेमसंबंधीत, चरित्रात्मक, इतिहासात्मक विद्यार्थ्यांना अषाप्रकारच्या कादंबरी वाचतांना कादंबरीतील एखाद्या व्यक्तिविषयी, पात्राविषयी आत्मीयता वाटु लागते. त्यामुळे ते त्या पात्राकडे आकर्षीत होतात. कादंबरीतील ते पात्र म्हणजे जणू आपल्याच भोवती फिरत आहे किंवा ते पात्र म्हणजे आपण स्वतःच आहो आणि घडणाऱ्या घटना या आपल्या सभोवताली घडणाऱ्या आहे असे त्याला वाटु लागते. व ती कादंबरी म्हणजे आपल्या जीवनाषी निगडीत असून ते पात्र आपणच आहो व ते पात्र ज्या प्रमाणे जीवनात येणाऱ्या अडचणींचा सामना करतो व षेवटी यषस्वी होतो. त्यामधुन त्यांना आपल्या जीवनात येणाऱ्या अडचणींचा सामना करण्यासाठी मार्ग मिळतो. व आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्यासाठी प्रयत्न करतो.

**5) आत्मचरित्र** :–आत्मचरित्राचे दोन प्रकार असतात. चरित्र, आणि आत्मचरित्र. आत्मचरित्रात स्वतःविषयीचे कथन सविस्तर स्वरूपात मांडलेले असते. एक प्रकारे आत्मचरित्र म्हणजे स्वतःच्या जीवनाचा सार त्यात विस्तारीत केलेला असतो. व्यक्ति, विद्यार्थी आत्मचरित्र वाचत असतांना त्या व्यक्तिच्या जीवनातील घटना, त्याने केलेला संघर्ष त्यांच्या जीवनात असणाऱ्या व्यक्ति हे सर्व वाचून तो भारावून जातो. त्या व्यक्तिने आपल्या जीवनात यषस्वी होण्यासाठी केलेले प्रयत्न व त्याला जीवनात मिळालेले यष हे वाचत असतांना त्याच्या मनात विचार येतो. या व्यक्तिला जमले ते आपल्याला का जमणार नाही. आपणही आपल्या जीवनात यषस्वी होण्याकरीता संघर्ष करायचा प्रयत्न करायचे, कोणत्याही बाबतीत मागे हटायचे नाही. व आपणही एक यषस्वी व्यक्ति म्हणून समोर यायचे. या त्यांच्या विचाराने त्याचे

I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 371-377
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

व्यक्तिमत्व फुलत जाते. आत्मचरित्रातील नायकात तो स्वतःची छबी पाहत असतो. त्याच्या सभोवताली घडणाऱ्या घटना या प्रत्यक्षात आपल्याच सभोवताली घडत आहे. ही जाणीव त्याला होते. व त्या व्यक्तिमत्वामध्ये स्वतःचा षोध घेण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे तो स्वतःमध्ये विकासात्मक बदल करून स्वतःचे व्यक्तिमत्व विकासाच्या दिषेने घडविण्याचा प्रयत्न करतो.

चरित्र व आत्मचरित्र वाचून बऱ्याच जणाच्या व्यक्तिमत्वात बदल झाल्याचे दिसून येते. एखाद्या व्यक्तिच्या कहाणीने प्रेरीत होवून आपल्या जीवणातही तषा प्रकारचे बदल घडविण्याचा प्रयत्न करीत असतात. चरित्र–आत्मचरित्रात महान व्यक्तिची, समाजसुधारक, राजकीय व्यक्ति, संषोधक क्रिकेटर अभिनेते अषा व्यक्तिची कहाणी वाचून कोणीही प्रेरित होईल अषीच असतात. कधी कधी सामान्य व्यक्तिची जीवन कहाणी सुध्दा अनेकांना प्रेरित करणारी ठरू षकते. कारण ती व्यक्ति एक सामान्य व्यक्ति ते एक यषस्वी उद्योजक, समाजसुधारक, कषा प्रकारे घडत गेलेले असतात. याचे सविस्तर वर्णन या चरित्रात आत्मचरित्रात दिलेले राहते व या व्यक्तिच्या विचाराने त्यांच्या कार्याने प्रेरित होवून स्वतःचे व्यक्तिमत्व विकसीत करण्यास प्रोत्साहनमिळते.

**6) संदर्भग्रंथ** :–ग्रंथालयात अनेक प्रकारची संदर्भ ग्रंथे अभ्यासासाठी असतात. विद्यार्थ्यांना अभ्यास करीत असतांना अनेक प्रकारच्या माहितीची आवष्यकता भासते. ती माहिती कोणत्याही एका पुस्तकात मिळेल असे होत नाही. तेव्हा त्यांना त्यांच्या विषयानुरूप संदर्भ ग्रंथाचा वापर करावा लागतो. त्यातून त्यांना माहिती मिळविता येते. स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करतांना विद्यार्थ्यांना कोणत्याही एका पुस्तकाचा वापर करून अभ्यास होत नाही. त्यांना अनेक पुस्तकांचा वापर करावा लागतो. ग्रंथालयात संदर्भ विभाग हा महत्वाचा विभाग मानल्या जातो. संदर्भ विभागातील अनेक पुस्तकाचा वापर करून माहिती मिळविता येते. संदर्भ ग्रंथाचा वापर करतांना ते संपूर्ण पुस्तक अभ्यासकांच्या उपयोगाचे नसून त्यांना ज्याविषयावर माहिती पाहिजे असेल तेवढाच भाग त्यातून घ्यायचा असतो. ग्रंथालयात निरनिराळया प्रकारचे संदर्भग्रंथ असून जसे ज्ञानकोष, षब्दकोष, वांङ्मयकोष, चरित्रकोष तसेच प्रत्येक विषयानुरूप वेगवेगळे संदर्भ ग्रंथ असतात. संषोधकांना संषोधन करीत असतांना वेगवेगळया प्रकारच्या माहितीची गरज भासते. तेव्हा त्यांना अनेक प्रकारच्या संदर्भ ग्रंथाचा वापर करावा लागतो. बरीचषी माहिती त्यांना संदर्भ ग्रंथातून गोळा करावी लागते. या वेगवेगळया पुस्तकातून ग्रंथातून माहिती मिळवित असतांना विद्यार्थ्यांना अनेक प्रकारच्या माहितीचे ज्ञान मिळते व त्याच्या व्यक्तिमत्वात या ज्ञानाची भर पडून त्यांचा विकास होत जातो.

**7) मासिक** :–ग्रंथालयात अनेक मासिक येतात. यात काही मनोरंजनपर असतात तर काही स्पेषल विषायांवर निघतात. मासिकामध्ये खेळावर, महिलांवर, जनरल नॉलेज, स्पर्धापरीक्षा, आणि काही मासिक ही जनरल विषयांवर असतात. अषा जनरल मासिकात वेगवेगळे विषय हाताळलेले असतात. अषा वेगवेगळया प्रकारच्या मासिकांचे वाचन करून विद्यार्थी, व्यक्ति माहिती मिळवून आपले ज्ञान विकसीत करू षकतो. काही मासिके ही महिन्याचे येतात, काही आठवडयाचे असतात.

त्यामुळे अषा मासिकातून नेहमीच नवनवीन माहिती मिळण्यास मदत मिळते.

**8)वृत्तपत्रे :–**ग्रंथालय हे कोणत्याही प्रकारचे असो प्रत्येक ग्रंथालयात कमीजास्त प्रमाणात वृत्तपत्रे हे येतातच. वृत्तपत्रे हे ग्रंथालयातील महत्वाचे वाचन प्रकार आहे. षैक्षणिक ग्रंथालयात जे काही वृत्तपत्रे येतात ते स्टॅडवर लावल्या जातात जेणे करून विद्यार्थ्यांनी त्याचे वाचन करावे. वृत्तपत्रे हा वाचनाचा असा प्रकार आहे ज्याच्यात सगळया विषयांवर ताज्या बातम्या छापल्या जातात. त्यामुळे जगामध्ये घडत असणाऱ्या प्रत्येक घडामोडीची माहिती वृत्तपत्रातून मिळते. यामुळे दररोजचे वर्तमानपत्रे दिवसातून एकदा तरी चाळले तरी त्यातून भरपूर माहिती विद्यार्थ्यांना मिळू षकते. व आपले ज्ञान अद्यावत ठेवण्यास मदत मिळू षकते. तसेच सार्वजनिक ग्रंथालय हे समाजातील लोकांसाठी स्थापन झालेले असतात. कोणीही व्यक्ति या ग्रंथालयाचे सभासद बनू षकतात. त्यामुळे ज्यांना वाचनाची आवड आहे किंवा दररोजच्या ताज्या घडामोडी विषयी माहिती मिळविण्याची जिज्ञासा असतात. अषा व्यक्ति सार्वजनिक ग्रंथालयात जावून वेगवेगळया प्रकारच्या वृत्तपत्राचे वाचन करू षकतात. समाजातील कोणेतीही व्यक्ति आपल्या ज्ञानाची लालसा भागविण्यासाठी ग्रंथालयाचा उपयोग करू षकतात.

अशा प्रकारे व्यक्ति आपले व्यक्तिमत्व विकसीत करतांना वरिल सर्व वाचनीय साहित्याचा उपयोग करून आपले ज्ञान अद्यावत करू षकतात.

**निष्कर्ष :–**

व्यक्ति हा समाजात राहणारा एक घटक आहे. समूहासमूहाने मिळून समाज बनतो. समाजात राहात असतांना कोणतीही व्यक्ति ही एकटी राहू षकत नाही. त्याला समाजात समाजातील समूह सोबतच राहावे लागते. समाजात राहतांना प्रत्येक व्यक्तिचे एक वेगळे व्यक्तिमत्व असल्याचे जाणवते. प्रत्येक व्यक्ति एका विषिष्ट वयानंतर स्वतःचे व्यक्तिमत्व विकसीत करण्याकडे जास्त लक्ष देतांना दिसून येतो. प्रत्येकाला आपले व्यक्तिमत्व विकसीत करीत असतांना अनेक गोष्टींचा उपयोग करावा लागतो. त्यापैकीच एक म्हणजे ग्रंथालय होय. ग्रंथालय ग्रंथालयातील सर्व वाचनीय संग्रह यांचा व्यक्तिच्या व्यक्तिमत्व विकासात महत्वाची भूमिका असल्याचे दिसून येते.

**संदर्भ :–**

बावनकर, सौ हर्षदा (भूरे) ग्रंथालय : संदर्भ सेवा,श्लोक पब्लिकेषन, पुणे, 2010

गोखले, प्रा. हेमंत, : व्यक्तिमत्व विकासाचे सोपे मार्ग, विद्याभारती प्रकाषन लातूर,2006

नाथे, संजय : व्यक्तिमत्व विकास, नाथे पब्लिकेषन, नागपूर 2010

पालक, डॉ.सौ. सुनंदा : मी आणि माझे व्यक्तिमत्व, चंद्रकांत प्रकाषन, नागपूर 2019

पवार एस.पी. : ग्रंथालय व माहितीषास्त्र, फडके प्रकाषन कोल्हापूर 2009.